शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर या संस्थेस जिल्हा वार्षिक योजनांतर्गत मंजूर अनुदानातून यंत्रसामुग्री खरेदीस मान्यता प्रदान करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

शासन शुद्धीपत्रक, क्रमांक : यंत्रख-२०२६/प्र.क्र.२९१/प्रशा-१,

गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, नवीन गो.ते.संकुल,

९ वा मजला, मंत्रालय, मुंबई -४०० ००१.

दिनांक : १० ऑगस्ट, २०२६

वाचा :

१. समक्रमांक शासन निर्णय दिनांक : ०८.०७.२०२६.
२. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. DMER-२२०११/१४१/२०२६-PROC१, दिनांक १०.०६.२०२६.
३. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. DMER-२२०११/१४१/२०२६-PROC१, दिनांक ०३.०८.२०२६.

प्रस्तावना :

विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर या संस्थेतील नेत्रशल्यचिकित्साशास्त्र विभागाकरीता ५२-यंत्रसामुग्री व साधनसामुग्री या उद्दिष्टाखाली जिल्हा वार्षिक योजनांतर्गत प्राप्त होणाऱ्या अनुदानातून रूपये १४,९९,३०,६०९/- (अक्षरी रुपये चौदा कोटी नव्व्यांन्नव लक्ष तीस हजार सहाशे नऊ फक्त) (सर्व करांसहीत) इतक्या किंमतीची Comprehesive Opthalmology Diagnostic and Surgical Upgradation Projects खरेदीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये सादर केला होता. त्यास अनुसरून संदर्भ क्र. १ अन्वये शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. तथापि, संचालनालयाने, सदर प्रस्तावासाठी प्रशासकीय मान्यते ऐवजी तांत्रिक मान्यता आवश्यक असल्याने संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयातील "प्रशासकीय मान्यता" ऐवजी "तांत्रिक मान्यता" असा बदल करून देण्याबाबत संदर्भ क्र. ३ च्या पत्रान्वये प्रस्ताव सादर केला आहे. त्यानुषंगाने संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयाचे शुद्धीपत्रक निर्गमित करण्याचे शासन विचाराधिन होते.

शासन शुद्धीपत्रक :

सदर प्रकरणी संदर्भाधीन दिनांक ०८.०७.२०२६ च्या शासन निर्णयातील नमूद सर्व "प्रशासकीय मान्यता"

या ऐवजी

"तांत्रिक मान्यता" असे वाचण्यात यावे.

२. सदर शासन शुद्धीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२६०८१०१८०५१४३१५१ असा आहे. सदर शासन शुद्धीपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUDHIR JAYA SHETTY

Digitally signed by SUDHIR JAYA SHETTY
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MEDICAL EDUCATION AND DRUGS DEPARTMENT, 2.5.4.20=72ea277025fdf5a4898b244953b8240 6eea05963bc456f1e1e8621e5917d8305, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E9D37D499A521B728AEB3DC8 EC38B759420308B9FD7816002B4AF0FFBF111 1D7, cn=SUDHIR JAYA SHETTY
Date: 2026.08.10 18:27:06 +05'30'

(सुधीर जया शेट्टी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) आयुक्त (वै.शि.), वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई
२) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
३) महालेखाकार - १/२ (लेखा परिक्षा /लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
४) संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई
५) अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर
६) जिल्हा कोषागार अधिकारी, छत्रपती संभाजीनगर
७) निवडनस्ती (प्रशा-१)